**ठळक बातम्या**

- ब्रिक्स परिषद आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ब्राझिलियामध्ये दाखल

- ब्रिक्स समूह हा सर्वसमावेशक बहुपक्षीय धोरणांना पुढे घेऊन जाणारा महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय मंच असल्याचं अर्थमंत्री निर्मला सितारामन यांचं प्रतिपादन

- मुंबई उपनगरातल्या शासकीय जमिनींवर झालेल्या अतिक्रमणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची उद्योगमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**आणि**

- अमेरिकेकडून उद्यापासून लागू करण्यात येणाऱ्या आयातशुल्क अंमलबजावणीला १ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**<><><><>**

रिओ द जिनेरोमधील दोन दिवसांच्या ब्रिक्स शिखर परिषदेनंतर, ब्राझील दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काल ब्राझिलियामध्ये दाखल झाले. ब्राझीलच्या संरक्षणमंत्र्यांनी त्यांचं स्वागत केलं. ब्राझिलचे अध्यक्ष लुइझ इनासियोलुला दा सिल्वा यांच्यासमवेत ते आज व्यापार, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य आदी विविध मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. या भेटीत द्विपक्षीय करारावर स्वाक्षऱ्या होतील अशी माहिती ब्राझिलमधल्या भारतीय राजदूतांनी दिली. त्यानंतर आपल्या परदेश दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात मोदी नामीबियाला जाणार आहेत. नामीबियाचा त्यांचा हा पहिलाच दौरा आहे. द्विपक्षीय संबंध वृद्धिंगत करणे आणि सहकार्याच्या विविध क्षेत्रांचा शोध घेणे हा या दौऱ्याचा उद्देश आहे.

**<><><><>**

ब्रिक्स समूह हा सर्वसमावेशक बहुपक्षीय धोरणांना पुढे घेऊन जाणारा एक महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय मंच असल्याचं अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल रियो दि जिनेरो इथं ब्रिक्स अर्थमंत्र्यांच्या आणि केंद्रीय बँकांच्या गव्हरनरांच्या बैठकीला संबोधित करत होत्या. आंतरराष्ट्रीय संस्था वैधतेच्या आणि प्रतिनिधीत्वाच्या संकटात सापडलेले

असताना आपापसातलं सहकार्य वृद्धींगत करुन विश्वासपूर्वक सुधारणांचं समर्थन करणं महत्त्वाचं आहे असंही त्या म्हणाल्या. ग्लोबल साऊथ क्षेत्रातल्या समस्या पुढे आणून आपल्याला एक उदाहरण द्यावं लागेल. असंही त्यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या की, भारतानं घरगुती मागणी, विवेकपूर्ण आर्थिक व्यवस्थापन आणि राजकोषीय उपायांच्या संतुलनातून सकारात्मक प्रदर्शन केलं आहे.

**<><><><>**

मुंबई उपनगरातल्या शासकीय जमिनींवर झालेल्या अतिक्रमणाची चौकशी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली मुंबईचे पोलीस आयुक्त, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी, तसंच मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत केली. आमदार योगेश सागर यांनी या भागातल्या अतिक्रमणाबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. यश समितीच्या कार्यवाहीचा अहवाल दर तीन महिन्यांनी घेतला जाईल, असंही त्यांनी सांगितलं. आमदार अमीन पटेल आणि रईस शेख यांनी पुन्हापुन्हा अशा प्रकारच्या लक्षवेधी सूचना आणून एका विशिष्ट धर्माला लक्ष्य केलं जात असल्याचा आरोप केला. सामंत यांनी यात कोणावरही अन्याय होणार नाही, धार्मिक तेढ निर्माण होणार नाही, अशी ग्वाही दिली. मात्र जाणीवपूर्वक अनधिकृत बांधकामांवर कारवाई होणं गरजेचं असल्याचंही ते म्हणाले.अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सुरुवातीला काही तांत्रिक अडचणी आल्या, मात्र आत्तापर्यंत पाच लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचं महाविद्यालय मिळालं असून कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित होणार नाही, अशी ग्वाही शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत दिली. आमदार अभिमन्यू पवार यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर आमदार नारायण कुचे यांनी मांडलेल्या मुद्द्याला ते उत्तर देत होते.

विधानसभेच्या नियमित कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होण्यापूर्वी न्यायमूर्ती भूषण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव विधानसभेनं संमत केला. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हा प्रस्ताव मांडला. सभागृहानं एकमतानं तो मंजूर केला. यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी, भारताच्या सरन्यायाधीशांचा सत्कार आज विधानभवनात होत असताना विधानसभेत विरोधी पक्षनेता नसणं हे योग्य

नाही, असा मुद्दा उपस्थित केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनीही हा मुद्दा लावून धरत आक्रमक पवित्रा घेतला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, याचा निर्णय घेण्याचा अधिकार आपला असून यावर सभागृहात चर्चा घेणं योग्य आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. याबाबतचा निर्णय कधीपर्यंत घेणार ते अध्यक्षांनी सांगावं अशी मागणी विरोधकांनी केली. त्यावर, अशी कालमर्यादा ठरवण्याची मागणी योग्य नसल्याचं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलं. यावर विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केली. अध्यक्षांची ही भूमिका लोकशाहीविरोधी असल्याची टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. त्यानंतर या मुद्द्यावरून विरोधकांनी सभात्याग केला.

**<><><><>**

राज्यातील झॉमेटो, स्विगी अशा प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या गिग वर्कर्सची संख्या भविष्यात वाढणार असून, सरकार त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदे निर्माण करणार असून, त्याचा मसूद्यावर सध्या काम सुरू असून, त्याद्वारे या कामगारांना सामाजिक सुरक्षा देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विरोधी पक्षांनी, नियम २६० अन्वये मांडलेल्या ठरावाला उत्तर देतांना दिली.

**<><><><>**

देशाचे सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे सुपुत्र असलेल्या भूषण गवई यांचा आज राज्य विधानमंडळातर्फे सत्कार करण्यात येणार आहे. दुपारी दोन वाजता विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हा सत्कार होणार असून यावेळी त्याचं भारताची राज्यघटना या विषयावर व्याख्यानही होणार आहे. या कार्यक्रमाचं समाजमाध्यमांवर थेट प्रक्षेपण करण्यात येणार असल्याची माहिती जनसंपर्क विभागानं दिली आहे.

**<><><><>**

अमेरिकेकडून नऊ जुलैपासून लागू करण्यात येणाऱ्या आयातशुल्क अंमलबजावणीला आता एक ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, त्यामुळे जगभरातील अनेक देशांना दिलासा मिळाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, १४ देशांवरील नवीन आयातशुल्काची रूपरेषा जाहीर करण्यात आली असून, ते एक ऑगस्टपासून लागू होतील. दोन एप्रिल रोजी भारतासह अनेक देशांना

आयातशुल्क लागू करण्याचा निर्णय जाहीर केला होता, परंतु नंतर त्यांची अंमलबजावणी ९० दिवसांसाठी थांबवण्यात आली, ज्यामुळे अनेक देशांना व्यापारी करार करण्यासाठी नऊ जुलैपर्यंत वेळ मिळाला. आता बाधित देशांना अमेरिकेसोबत अंतरिम व्यापार करारांना अंतिम रूप देण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळाला आहे.

<><><><>

इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पारितोषिक देण्यासाठी शिफारस केली आहे. जागतिक शांततेसाठी त्यांनी केलेले प्रयत्न महत्त्वाचे असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. काल व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या रात्रीच्या जेवणाच्या वेळी त्यांनी नोबेल पारितोषिक समितीला दिलेल्या पत्राची प्रत डोनाल्ड ट्रम्प यांनाही सुपूर्द केली. यावर्षीची त्यांची ही तिसरी भेट आहे. जागतिक स्तरावरच्या आणि खास करुन पश्चिम अशियातल्या ट्रम्प यांच्या शांततेसाठीच्या प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा केली.

<><><><>

अमेरिकेच्या टेक्सासमध्ये गेल्या काही दिवसांपासून आलेल्या पुरामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या १०० वर पोहोचली आहे. मृतांमधील बहुसंख्य केरी काऊंटी या भागातले आहेत. मॅस्टिक ख्रिश्चन शिबिरातल्या २८ मुलींचाही या पूरामुळे मृत्यू झाला असून यात २८ लहान मुलांचाही समावेश आहे. ग्वाडालुपेनदीच्या किनाऱ्यावर धोक्याचा इशारा देणारे सायरन लावण्यात आले असते तर मृतांची संख्या कमी झाली असती असं अमेरिकेच्या प्रशासनानं म्हटलं आहे. पुढच्या वर्षीच्या उन्हाळ्याआधी या भागात सायरन लावले जातील असंही त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय हवामान संस्थेच्या निधीत कपात केल्यामुळे अशा प्रकारच्या दुर्घटनांची आगाऊ सूचना देता आली नसल्याच्या आरोपांचा व्हाईट हाऊसनं इन्कार केला आहे.

<><><><>

नागालँडमध्ये संततधार पावसामुळे दिमापूर, निउलँड या जिल्ह्यांमध्ये विविध ठिकाणी घरांची पडझड झाली आहे, असं राज्य आपत्ती प्रतिसाद दलानं सांगितलं आहे. या जिल्ह्यातल्या सखल भागात पाणी साचल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. पावसामुळे

शेतात उभ्या असलेल्या पिकांचेही नुकसान झालं आहे. या आठवड्यात नागालँडमध्ये मुसळधार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.

**//<><><><>//**